**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २५६ । शुक्रवार १० जुलै २०२६। पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# मेहकरीतील सहा दूध केंद्रांवर अन्न व औषध विभागाचे छापे

## संशयित नमुने तपासणीसाठी ताब्यात । भेसळखोरांचे धाबे दणाणले



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर-पाथर्डी रस्त्यावरील मेहकरी आणि मराठवाडीजवळ अन्न आणि औषध प्रशासनाच्या विविध पथकांनी शुक्रवारी (दि.१०) सकाळी छापे टाकले. दिवसभर ही कार्यवाही सुरु होती. दुधाचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविणार सांगण्यात येत आहे.

अन्न आणि औषध विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली संपुर्ण राज्यात दुध भेसळखोरांच्या मुसक्या आवळण्यासाठी राज्यभार धडक कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या ■ पान ४ वर

### पथक नगरमध्ये तळ ठोकून

नाशिकहून नगरकध्ये दाखल झोलेल्या या पथकाने मेहकरी येथे ६ व मराठवाडीजवळ अशा २ ठिकाणी छापे टाकले. अशा एकूण ८ ठिकाणी छापे टाकले असून हे पथक अद्यापही नगरमध्येच ठाण मांडून आहे. नगर तालुक्यातील अन्य गावांसह जिल्ह्यातील अन्य भागातही छापे टाकले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे भेसळयुक्त दूध व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

### नगर जिल्ह्यावर विशेष लक्ष

दूध संकलनात अहिल्यानगर जिल्ह्याचा राज्यात चांगला लौकिक आहे. मात्र आयुक्त पदावर मुंडे हे रूजू झाल्यापासून दूध भेसळखोरांमध्ये चांगलीच दहशत निर्माण झाली असून सध्या दूध संकलनाचा आकडा कमी झाला आहे. त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यात भेसळयुक्त दूध तयार केले जात असल्याचा संशय अधिक गडद झाला आहे.

# लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने ५८ सफाई कर्मचाऱ्यांना नियुक्ती

## नवनियुक्तांनी 'स्वच्छता दूत' बनून नगरकरांना उत्तम सेवा द्यावी – महापौर ज्योती गाडे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने ५८ पात्र वारसांना रिक्त सफाई कामगार पदांवर नियुक्ती देऊन नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले. महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते हा सोहळा पार पडला.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, महानगरपालिकेतील अधिकारी, कर्मचारी व सफाई कामगारांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात कमी होत आहे. अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे विविध विभागांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला असून, त्यामुळे शहरातील कामकाजात विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तसेच, महानगरपालिकेतील अनुभवी अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त होत असल्याने नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्याकडून कामकाजाचे बारकावे शिकून घेऊन नगरकरांना अधिक चांगल्या सेवा द्याव्यात. सफाई कर्मचाऱ्यांनी 'स्वच्छता दूत' म्हणून कार्य करत शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा तसेच रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, स्थायी समितीचे सभापती पै. सुभाष लोंढे, महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती वर्षा सानप, रोहन सानप, माजी नगरसेवक जितू गंभीर यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी व नवनियुक्त सफाई कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी सांगितले ■ पान ४ वर

# नगर शहरातील तीन, तर पाथर्डीतील एक टोळी हद्दपार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयाने कठोर पावले उचलली असून, शरीराविरुद्ध व मालाविरुद्ध गंभीर गुन्हे करणाऱ्या ४ सराईत टोळ्यांना एकाच आठवड्यात जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये नगर शहरातील ३ आणि पाथर्डी तालुक्यातील एका टोळीचा समावेश आहे.

भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनच्या हद्दीतील खुनाचा प्रयत्न आणि घातक शस्त्रांचा वापर करणाऱ्या टोळीतील सलमान शेख, अभिषेक धाडगे व हर्षवर्धन तपकिरे या तिघांना ६ महिन्यांसाठी हद्दपार केले आहे. तसेच, भिंगार कॅम्प हद्दीतीलच घरफोडी आणि चोरीच्या गुन्ह्यांत सक्रिय असलेल्या आयान शेख व अकबर खान या दोघांना १२ महिन्यांसाठी जिल्ह्यातून बाहेर काढले आहे. तोफखाना पोलीस स्टेशन हद्दीत गंभीर दुखापत करून दहशत पसरवणाऱ्या वैभव बारस्कर व अजय कर्पे या जोडीवरही ३ महिन्यांची हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे.

पाथर्डी तालुक्यात गोवंशीय प्राण्यांचे मांस विक्री आणि प्राण्यांवरील क्रूरतेच्या गुन्ह्यांत गुंतलेल्या रेहान कुरेशी, जव्वाद शेख व अमजद शेख या तिघांना नगर, नेवासा, पाथर्डी व शेवगाव या चार तालुक्यांतून ६ महिन्यांसाठी हद्दपार करण्यात आले आहे.

या सर्व टोळ्यांवर एकूण ५ ते ८ गंभीर गुन्हे दाखल होते. गुन्हेगारी टोळ्यांचा बिमोड करण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयाने ही धडक मोहीम हाती घेतली असून, वाळू चोरी, हत्यार बंदी कायदा व इतर गंभीर गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगारांची माहिती संकलित केली जात आहे. आगामी काळातही अशा प्रवृत्तींविरुद्ध कडक हद्दपारीची कारवाई सुरूच राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

मुख्याधिकारी दिघे यांच्याबाबत

# चुकीचा शब्दप्रयोग खपवून घेणार नाही – उपनगराध्यक्ष अभय शेळके पा.

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**शिर्डी–** शिर्डीतील १२ नंबर चारी पूर्णपणे बंदिस्त करण्याला तेथील काही स्थानिक शेतकरी ग्रामस्थांनी विरोध करत काही दिवसांपूर्वी आंदोलन छेडले होते त्यानंतर आरोप प्रत्यारोप झाल्यानंतर उपनगराध्यक्ष अभय भैय्या शेळके यांनी पुढाकार घेत सामंजस्याची भूमिका घेतली व शेतकऱ्यांच्या भावना लक्षात घेत सदर चारीचे काम युवानेते डॉ सुजय विखे पाटील यांच्या सोबत बैठक होईपर्यंत तात्पुरते बंद ठेवू असे आश्वासित केल्याने हा वाद शमला असे चित्र असतानाच सोशल मीडियाच्या माध्यमातून काही तरुणांनी कमेंट करत मुख्याधिकारी सतीश दिघे यांना ■ पान ४ वर

# दहा हजारांची लाच स्वीकारताना कर्जतचा सहाय्यक निबंधक चतुर्भुज

## नगर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** दहा हजार रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या कर्जतच्या सहाय्यक निबंधक मिलिंद राऊन याला नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे. त्यामुळे कर्जत तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

तक्रारदार यांचे कर्जत तालुक्यातील सहकार कार्यालयात काम होते. परंतु मिलिंद राऊन यांनी त्यांच्या कामाची अडवणुक करुन लाचेची मागणी केली. त्यामुळे तक्रारदाराने नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. त्यानुसार नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शुक्रवारी (दि.१०) कर्जत येथे सापळा रचून सहाय्यक निबंधक मिलिंद राऊन यांना दहा हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले.

# ठेकेदारांकडे ७ कोटींची थकबाकी, पण ८ कोटींच्या वसुलीची नोटीस मात्र माथाडी कामगारांना

## सहाय्यक कामगार आयुक्तांचा अजब कारभार, कामगारांचा आक्रमक पवित्रा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** रेल्वे मालधक्का येथील नोंदणीकृत माथाडी कामगारांनी सहाय्यक कामगार आयुक्त, अहिल्यानगर तथा अध्यक्ष माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. ठेकेदार हुंडेकऱ्यांकडून सुमारे सात कोटी रुपयांची थकबाकी असताना ती वसूल करण्या ऐवजी उलट गोर गरीब कामगारां कडूनच तब्बल आठ कोटी रुपयांची वसुलीची कारवाई सुरू केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे मंडळ हे कामगारांच्या हितासाठी आहे की थकबाकीदार असणाऱ्या बड्या ठेकेदारांना संरक्षण देण्यासाठी, असा संतप्त सवाल शिवसेना कामगार आघाडीचे जिल्हाप्रमुख विलास उबाळे यांनी उपस्थित केला आहे.

ठेकेदारांकडे कोट्यावधींची थकबाकी असताना ८ कोटींच्या वसुलीच्या नोटीसा मात्र माथाडी कामगारांना धाडण्यात आल्यामुळे सहाय्यक कामगार आयुक्तांचा अजब कारभार चव्हाट्यावर आला आहे. त्या विरोधात कामगारांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. याबाबत सहाय्यक कामगार आयुक्त यांना निवेदन देत कामगारांचे आर्थिक शोषण थांबवण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी विलास उबाळे, सुनील भिंगारदिवे, जयराम आखाडे, गौतम सैंदाने, देवराम शिंदे, बाबासाहेब वैरागर, विनोद शिरसाठ, मल्हारी साप्ते, दिपक काकडे, राजेंद्र तरटे आदींसह कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याबाबत बोलताना विलास उबाळे म्हणाले, ठेकेदार हुंडेकऱ्यांकडे मागील सुमारे तीन वर्षांपासून कोट्यावधी रुपयांची थकबाकी आहे. त्याचा पहिला हप्ता मिळविण्यासाठी आम्हाला आमच्या संघटनेच्या माध्यमातून धरणे आंदोलन, मुंडण आंदोलन, मुंबईत आझाद मैदानावर सहा दिवस उपोषण, त्यानंतर बायको, लेकरा बाळांसह अहिल्यानगर शहराच्या बाजारपेठेतून आक्रोश मोर्चा काढावा लागला होता. तेव्हा कामगारांच्या पदरात पहिला हप्ता पडला. मात्र त्यानंतर दोन वर्ष उलटले तरी देखील जाणीवपूर्वक ठेकेदारांना पाठीशी घालण्याचे काम मंडळाकडून सुरू आहे. आम्ही मागणी करतो म्हणून आमचा आवाज दाबण्यासाठी आमच्यावरच चुकीच्या पद्धतीने तब्बल आठ कोटी रुपयांची वसुलीची कारवाई सुरू करून कामगारांना भीती दाखवली जात आहे.

निवेदनात म्हटले आहे, ऑगस्ट २०२५ पासून हजेरी पत्रकानुसार पूर्ण वेतन देखील मिळत नसून दर महिन्याला वेतनात कपात करून कामगारांचे आर्थिक शोषण केले ■ पान ४ वर

# 'ऑपरेशन शोध-४' अंतर्गत ९८ बेपत्ता बालकांची सुटका

## राज्यस्तरीय मोहीम जिल्ह्यात यशस्वी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर पोलीस प्रशासनाने जिल्ह्यात राबविलेल्या ऑपरेशन शोध-४ या विशेष मोहिमेत ९८ बेपत्ता बालकांचा शोध घेवून त्यांना त्यांच्या कुटुंबियांच्या स्वाधीन करण्यात यश मिळवले आहे. शोध घेण्यात आलेल्यांमध्ये ९० मुली आणि ८ मुलांचा समावेश आहे.

महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक आणि महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, मुंबई यांच्या सूचनेनुसार दि. ८ जून ते २३ जून २०२६ या कालावधीत ही राज्यस्तरीय विशेष मोहीम जिल्ह्यात राबविण्यात आली. अल्पवयीन बेपत्ता मुले आणि मुलींचा शोध घेणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता.

या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणी, विशेष पथके आणि अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष () यांनी समन्वयाने काम केले. प्रत्येक उपविभागीय पोलीस अधिकारी () कार्यालय आणि पोलीस ठाणे स्तरावर विशेष पथके तयार करण्यात आली होती. गोपनीय माहिती, व्यावसायिक कौशल्य आणि इतर जिल्ह्यांशी साधलेला समन्वय यांच्या जोरावर पोलिसांनी या ९८ बालकांचा माग काढला व आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यांना पालकांच्या स्वाधीन केले.

### नागरिकांनाआवाहन

पोलीस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, बालकांच्या अपहरणाविषयी किंवा बेपत्ता असण्याबाबत कोणतीही माहिती असल्यास ती त्वरित पोलीसांना कळवावी. अशा प्रकारच्या मोहिमा पुढेही सुरूच राहतील. ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी गणेश उगले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरण शिंदे, शकील अहमद शेख, समीर सय्यद व अन्य सहकाऱ्यांच्या पथकाने यशस्वी केली.

# मुख्य रस्त्याचे काम मंजूर आराखड्यानुसारच करा – खासदार लंके

## । पारनेरच्या विकासाचा पाया भक्कम करण्यासाठी दूरदृष्टीचे नियोजन
## । चौकांचे सुशोभीकरण, दुभाजक, पथदिवे आणि भविष्यातील जलवाहिन्यांसाठी आताच तरतूद करण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** पारनेर शहरातील विघ्नहर्ता रुग्णालय ते हिंद चौक दरम्यानच्या मुख्य रस्त्याचे काम मंजूर आराखड्यानुसारच पूर्ण करण्यात यावे आणि शहराच्या पुढील पन्नास वर्षांच्या विकासाचा विचार करून सर्व आवश्यक नागरी सुविधांची तरतूद करण्यात यावी, अशा स्पष्ट सूचना खासदार नीलेश लंके यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना व संबंधित ठेकेदार कंपनीच्या प्रतिनिधींना दिल्या.

देवीभोयरे फाटा (पारनेर) ते खडकी (अहिल्यानगर) या ४८ किलोमीटर लांबीच्या राज्य मार्गाचे काम महाराष्ट्र रस्ते सुधारणा प्रकल्पांतर्गत सुरू असून, या सिमेंट काँक्रीट रस्त्यासाठी खा. लंके यांच्या माध्यमातून ३६२ कोटी ४० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पारनेर शहरातून जाणाऱ्या या रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत विविध स्तरांवर चर्चा सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी पारनेर नगरपंचायत कार्यालयात खासदार लंके यांच्या उपस्थितीत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले.

बैठकीत खासदार लंके यांनी सांगितले की, संपूर्ण रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर या मार्गावरील वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. त्यामुळे भविष्यातील गरजा लक्षात घेऊन मंजूर आराखड्यानुसारच काम पूर्ण करणे आवश्यक आहे. शहरातून जाणाऱ्या रस्त्यावर दुभाजक, आधुनिक पथदिवे, सुरक्षित वाहतूक व्यवस्था आणि नागरिकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. तसेच पारनेर शहरासाठी मुळा धरणातून प्रस्तावित असलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या जलवाहिन्या टाकण्यासाठी आवश्यक तरतूद आताच करण्यात यावी, जेणेकरून भविष्यात रस्ता पुन्हा खोदण्याची वेळ येणार नाही. ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### नगर-पुणे शटल रेल्वेसाठी रविवारी दिल्ली गेटवर जनआंदोलन

अहिल्यानगर - अहिल्यानगरपुणे दरम्यान नियमित शटल रेल्वे सेवा तातडीने सुरू करावी, तसेच नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचा रद्द झालेला परवाना पुन्हा बहाल करून बँकेचे कामकाज पूर्ववत सुरू करण्यात यावे, या दोन प्रमुख मागण्यांसाठी पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. १९ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता ऐतिहासिक दिल्ली गेट येथे जनआंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून अहिल्यानगरकरांचा आक्रोश राज्य व केंद्र सरकारपर्यंत पोहोचविण्याचा निर्धार करण्यात आला असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाईनचे संस्थापक तथा ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी दिली. ॲड. गवळी म्हणाले की, अहिल्यानगर आणि पुणे या शहरांदरम्यान शिक्षण, नोकरी, उद्योग, व्यापार, आरोग्यसेवा, न्यायालयीन कामकाज तसेच विविध शासकीय कामांसाठी दररोज हजारो नागरिक प्रवास करतात. मात्र, अपुरी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, खासगी वाहनांचा वाढता खर्च आणि इंधन दरवाढ यांमुळे प्रवाशांना मोठा आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.अशा परिस्थितीत नगरपुणे शटल रेल्वे सेवा ही केवळ प्रवासाची सुविधा नसून अहिल्यानगरच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक गरज बनली आहे. ही सेवा सुरू झाल्यास विद्यार्थी, नोकरदार, व्यापारी, उद्योजक, रुग्ण आणि सर्वसामान्य प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल. प्रवासाचा वेळ व खर्च कमी होईल, रस्त्यांवरील वाहतूक कोंडी घटेल आणि जिल्ह्याच्या आर्थिक विकासालाही गती मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

### नितीन कोलते यांना पीएच.डी. पदवी प्रदान



अहिल्यानगर- न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथील हिंदी संशोधन केंद्रासाठी आजचा दिवस अत्यंत अभिमानाचा ठरला. संशोधक श्री. नितीन कोलते यांना दि. ६ जुलै २०२६ रोजी हिंदी विषयातील 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी ' ही पदवी बहाल करण्यात आली. श्री. कोलते यांनी ''श्रीलाल शुक्ल एवं सुभाष भेंडे के उपन्यासों में मूल्य संक्रमण : एक तुलनात्मक अध्ययन'' या विषयावर आपला संशोधन प्रबंध यशस्वीरीत्या पूर्ण केला. या संशोधनामध्ये हिंदी आणि मराठी साहित्यातील दोन महत्त्वाच्या कादंबरीकारांच्या साहित्यामधून सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, नैतिक व धार्मिक मूल्यांतील संक्रमणाचा तुलनात्मक आणि चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. मौखिक परीक्षा (-) यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर त्यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. या संशोधनकार्याला न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथील हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. हनुमान जगताप यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या विद्वत्तापूर्ण मार्गदर्शनामुळे व सातत्यपूर्ण प्रेरणेमुळे संशोधकाला ही उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरी साध्य करता आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी श्री. नितीन कोलते यांचे अभिनंदन करताना संशोधनाच्या माध्यमातून समाजाला नवी दिशा देणे हे उच्च शिक्षणाचे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट असल्याचे सांगितले. त्यांनी ही उपलब्धी महाविद्यालय आणि हिंदी संशोधन केंद्रासाठी अभिमानाची बाब असल्याचे नमूद केले.

### वकिलांसाठी दर महिन्याला नियमित ऑनलाईन कायदे प्रशिक्षणाची मागणी

अहिल्यानगर- देशातील न्यायव्यवस्था अधिक सक्षम, गतिमान, आधुनिक आणि लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने राज्यातील सर्व वकिलांसाठी नियमित डिस्टन्स ॲडव्हान्स्ड लीगल ट्रेनिंग अथवा सुरू करण्याची महत्त्वपूर्ण मागणी पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने वरिष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी केली आहे. दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी दुपारी १ ते ३ या वेळेत ऑनलाईन माध्यमातून दोन तासांचे प्रशिक्षण सत्र नियमितपणे आयोजित करण्यात यावे, असा प्रस्ताव त्यांनी मांडला असून, यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालय आणि बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा यांच्याकडे औपचारिक पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.या संदर्भात ॲड. गवळी यांनी सर्वोच्च न्यायालयाने ७ जुलै २०२६ रोजी दिलेल्या अजय विज विरुद्ध इंडियन बँक असोसिएशन आणि इतर या महत्त्वपूर्ण निर्णयाचा आधार घेतला आहे.

# नेवासा पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांची 'धडक' कामगिरी

## लोकसहभागातून संपूर्ण नेवासा शहर आणि नेवासा फाटा सीसीटीव्हीच्या नजरकैदेत!

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासा–** नेवासा शहर आणि नेवासा फाटा परिसराच्या सुरक्षेचा प्रश्न अनेक वर्षांपासून रेंगाळलेला होता. मात्र, नुकतेच हजर झालेले पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी आपल्या खास पोलीस कौशल्याचा वापर करत, लोकसहभागातून या संपूर्ण परिसराला सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या भक्कम सुरक्षेचे कवच मिळवून दिले आहे. त्यांच्या या धाडसी आणि कौतुकास्पद नियोजनामुळे आता संपूर्ण नेवासा परिसर सीसीटीव्हीच्या तिसऱ्या डोळ्याच्या थेट नियंत्रणाखाली आला आहे.

टोलवाटोलवीला पूर्णविराम; दराडेंचा थेट पुढाकार यापूर्वी नेवासा शहरात सीसीटीव्ही बसवण्यावरून केवळ राजकारण आणि टोलवाटोलवी पाहायला मिळत होती. पोलीस प्रशासन हा विषय नगरपरिषदेवर ढकलायचे, तर नगरपरिषद पोलीस प्रशासनाकडे बोट दाखवायची. यापूर्वी अनेक पोलीस निरीक्षक, लोकप्रतिनिधी, नगरसेवक आणि नगराध्यक्ष आले आणि गेले; परंतु प्रत्यक्षात सुरक्षेच्या दृष्टीने असे ठोस नियोजन कोणालाही करता आले नाही. नेवासा शहराच्या सुरक्षेची जिम्मेदारी घेण्यास कोणीही गंभीर नव्हते.

''केवळ प्रशासकीय कागदपत्रांवर अवलंबून न राहता, पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी स्वतः पुढाकार घेतला. त्यांनी नेवासातील जनतेमध्ये सुरक्षेबाबत जनजागृती केली आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले. त्यांच्या या एकाच आवाहनाला जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.''

**महत्त्वाचे चौक आणि परिसर हायटेक**

लोकसहभागातून बघता-बघता नेवासा शहरातील आणि




फाट्यावरील मुख्य आणि संवेदनशील ठिकाणे सुरक्षित करण्यात आली आहेत. यामध्ये प्रामुख्याने गणपती चौक, बस स्टँड परिसर, पंचायत समिती परिसर, नगरपरिषद परिसर तसेच नेवासा फाट्यावरील राजमुद्रा चौक आणि आंबेडकर चौक या विविध ठिकाणी उच्च क्षमतेचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

**थेट मोबाईलवर नियंत्रण; गुन्हेगारांचे धाबे दणाणले**

या मोहिमेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, या सर्व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे संपूर्ण कव्हरेज पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी स्वतःच्या मोबाईलवर घेतले आहे. ते स्वतः अत्यंत बारकाईने नेवासा शहर आणि फाटा परिसरातील हालचालींवर २४ तास नजर ठेवून आहेत. यामुळे शहरातील टवाळखोर, चोऱ्या आणि इतर गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा बसणार असून गुन्हेगारांचे धाबे पार दणाणले आहेत.

नागेबाबा संस्थेचे सहकार्य मोलाचे; गुगल बॅकअप अन् क्लाउडमुळे यंत्रणा झाली अभेद्य!

''मी जेव्हा नेवासाकरांना सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले, तेव्हा नागेबाबा सारख्या अग्रगण्य संस्थेने तात्काळ पुढे येत अत्यंत मोलाचे सहकार्य केले, त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. हे कॅमेरे अत्यंत हायटेक असून ते थेट सोलर सिस्टीमवर चालतात; त्यामुळे भविष्यात वीज (लाईट) असो वा नसो, कॅमेऱ्यांचे काम अविरत सुरू राहील.

या कॅमेऱ्यांचा एक्सेस पूर्णपणे गुगल बॅकअप आणि मोबाईलवर कनेक्टेड असून सर्व डेटा क्लाउडवर सुरक्षितपणे स्टोअर होतो. विशेष म्हणजे, जर कोणी हे कॅमेरे चोरण्याचा किंवा नष्ट करण्याचा प्रयत्न केला, तरीही शेवटच्या सेकंदापर्यंतचे रेकॉर्डिंग क्लाउड स्टोरेज मार्फत पोलिसांना तात्काळ उपलब्ध होईल. भविष्यातही शहरातील इतर अनेक ठिकाणी कॅमेरे बसवायचे असून नागरिकांनी अशाच प्रकारे पुढे येऊन सहकार्य करावे.''

प्रताप दराडे (पोलीस निरीक्षक, नेवासा)

**शहराचं दायित्व घ्यायला मोठं काळीज लागतं!**

''शहरात काय चाललंय याच्याशी आम्हाला काय देणं-घेणं, अशी उदासीन भूमिका घेणारे अधिकारी आम्ही आजवर खूप पाहिले. केवळ खाकी वर्दी घालून नोकरी करायची म्हणून अनेक जण येतात आणि जातात. पण, नागरिकांच्या सुरक्षेची खरी तळमळ असणे आणि संपूर्ण शहराचं दायित्व स्वतःच्या खांद्यावर घेणे, यासाठी पैशांपेक्षा खूप मोठं काळीज लागतं!

जे काम वर्षानुवर्षे लोकप्रतिनिधी आणि नगरपरिषदेला जमले नाही, ते दराडे साहेबांनी आपल्या इच्छाशक्तीच्या जोरावर अवघ्या काही दिवसांत करून दाखवले. नेवासाकरांना आता खऱ्या अर्थाने एक हक्काचा रक्षक मिळाला असून आम्ही त्यांच्या या उपक्रमाचे जाहीर स्वागत करतो.''

एक जागरूक नागरिक, नेवासा शहर.

पुढील टप्प्यात शाळा-कॉलेजेस आणि औद्योगिक वसाहतींवर लक्ष केंद्रित करण्याची मागणी

पोलीस निरीक्षक दराडे यांच्या या सुरक्षिततेच्या पॅटर्नचे स्वागत करत असतानाच, नेवासातील सुजाण नागरिकांनी पोलिसांकडे एक अत्यंत महत्त्वाची भावना व्यक्त केली आहे. शहराचा मुख्य भाग आणि चौक आता तिसऱ्या डोळ्याच्या निगराणीखाली आले असले, तरीही शहरातील सर्व नामांकित शाळा, महाविद्यालये (कॉलेजेस) आणि जेथे मोठे उद्योग व व्यवसाय आहेत, अशा औद्योगिक परिसरामध्ये देखील सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत. यामुळे विद्यार्थिनींची सुरक्षा आणि औद्योगिक क्षेत्रातील चोऱ्यांना पूर्णपणे लगाम घालता येईल, अशी आशा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

**नेवासा जनतेकडून कौतुकाचा वर्षाव**

प्रशासकीय दिरंगाईला बाजूला सारून, लोकसहभागाच्या ताकदीवर अवघ्या काही दिवसांत नेवासा शहराचा सुरक्षा स्तर हायटेक करणाऱ्या पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या या युक्तीचे सर्वत्र कौतुक होत आहे. सुरक्षिततेची नवी पहाट आणल्याबद्दल नेवासातील व्यापारी, महिला आणि सर्वसामान्य जनता त्यांचे आभार मानत आहे.

## श्री वृध्देश्वर हायस्कूलचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे तिसगाव येथील श्री वृध्देश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने शिष्यवृत्ती परीक्षेत नेत्रदीपक कामगिरी केली आहे फेब्रुवारी २०२६ मध्ये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये विद्यालयातील पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत १३ विद्यार्थी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत ९ विद्यार्थी पात्र झाले. पाचवीचा विद्यार्थी चि.आठरे नीरज लहानु (२२४ गुण) आणि आठवीचे विद्यार्थी चि.लवांडे महेश कल्याण(गुण २२०) व चि.चेमटे आरव अतुल(गुण २१०) हे तिन्ही विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवून शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा विद्यालयाचे प्राचार्य संजय म्हस्के, उपप्राचार्या सुनिता कवडीवाले व पर्यवेक्षक लहानु ताठे यांनी गौरव केला. विद्यालयात शिष्यवृत्ती, नवोदय, सैनिक स्कूल, एन एम एम एस, ज्ञानवर्धिनी, मंथन अशा वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांसाठी विशेष मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थ्यांकडून भरपूर सराव करून घेतला जातो व त्यातूनच अशा प्रकारचे यश विद्यार्थी मिळवतात असे यावेळेस प्राचार्य संजय म्हस्के यांनी सांगितले.

या सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयातील शिक्षक रावसाहेब राऊत, किरण दानवे, प्रविण साठे, शैलेश क्षेत्रे, प्रशांत शिंदे, राजेंद्र हंडाळ, प्रेरणा कदम यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ विवेक भापकर, सेक्रेटरी ॲड विश्वासराव आठरे, सहसेक्रेटरी मुकेश मुळे, खजिनदार ॲड दीपलक्ष्मी म्हसे, संस्थेचे सदस्य डॉ बाळकृष्ण मरकड, काशिनाथ पा. लवांडे, अरविंद आठरे, सरपंच मुनिफा शेख यांनी अभिनंदन केले.

## एन.एम. फाऊंडेशनतर्फे शहीद अब्दुल हमीद जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारताचे शूर, पराक्रमी आणि अद्वितीय वीरपुत्र शहीद अब्दुल हमीद यांची जयंती हा दिवस केवळ एका महान सैनिकाचे स्मरण करण्याचा नसून देशभक्ती, शौर्य, त्याग आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा घेण्याचा दिवस आहे, असे प्रतिपादन प्रमुख पाहुने नगरसेवक शहेबाज हाजी यांनी केले.

मनोगत व्यक्त करताना सय्यद जाहीद म्हणाले की, शहीद अब्दुल हमीद यांनी आपल्या शौर्याने संपूर्ण देशाला अभिमान वाटावा असा इतिहास घडविला. त्यांनी आपल्याला शिकवले की, देशसेवा ही केवळ सैनिकांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे पवित्र कर्तव्य आहे. प्रामाणिकपणे आपले कार्य करणे, समाजात एकता व बंधुभाव जपणे तसेच शिक्षणाच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीत योगदान देणे, हीदेखील खरी देशसेवाच आहे. आजच्या पिढीने मोबाईल आणि सोशल मीडियाच्या आहारी न जाता शहीदांच्या त्यागातून



प्रेरणा घेऊन निष्ठा, शिस्त, परिश्रम आणि देशप्रेम ही मूल्ये आपल्या जीवनात रुजवली, तरच त्यांना खरी आदरांजली ठरेल.असे नमुद केले.

एन.एम. फाऊंडेशन व मखदुम सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने शहीद अब्दुल हमीद यांच्या जयंतीनिमित्त 'मिशन आपुलकी' उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा, दरगाह दायरा येथील विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एसएमसीचे अध्यक्ष सय्यद साबीर होते.

## महसूल प्रशासनाला वाळू माफियांचे खुले आव्हान!

**कुरणपिंपरीत बंद केलेला चर बुजवून पुन्हा सुरू अवैध वाळू वाहतूक**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** कुरणपिंपरी ग्रामपंचायत हद्दीतील गोदावरी नदीपात्रातून होणारी अवैध वाळू वाहतूक रोखण्यासाठी महसूल प्रशासनाने वाळूचोरीच्या मार्गावर खोदलेला चर (खड्डा) अवघ्या काही दिवसांत बुजवून पुन्हा त्याच मार्गाने वाळूची वाहतूक सुरू करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यामुळे वाळू माफियांनी थेट महसूल प्रशासनालाच खुले आव्हान दिल्याची चर्चा तालुक्यात सुरू आहे.

महसूल विभागाने अवैध वाळू उपसा रोखण्यासाठी चर खोदून मार्ग बंद केला होता. मात्र संबंधितांनी तो चर बुजवून पुन्हा वाहतुकीसाठी रस्ता मोकळा केल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. रात्रीच्या वेळी ट्रॅक्टर आणि इतर वाहनांद्वारे मोठ्या प्रमाणावर अवैध वाळूची वाहतूक होत असल्याचा आरोपही ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

या प्रकरणात ग्रामदक्षता समितीतील काही सदस्यांचाही सहभाग असल्याचा आरोप होत असल्याने प्रकरण अधिकच गंभीर बनले आहे. या आरोपांमागील सत्य समोर आणण्यासाठी निष्पक्ष चौकशीची मागणी नागरिकांनी केली आहे.

गोदावरी नदीपात्रातील अवैध वाळू उपशामुळे पर्यावरणाचे नुकसान, नदीपात्राची हानी आणि शासनाच्या महसुलाला मोठा फटका बसत आहे. तरीही वाळू तस्करांवर प्रभावी अंकुश का बसत नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. आता महसूल प्रशासन, पोलिस आणि संबंधित यंत्रणा या प्रकरणाची दखल घेऊन चर बुजविणाऱ्यांवर, अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर तसेच चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करणार का, याकडे पैठण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## शब्दकोडे क्रमांक : २

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ■ | ४ | ■ | ५ | ६ | | ७ | ■ |
| | ■ | ८ | | ९ | | | ■ | | ■ | ११ | १२ |
| १३ | १४ | | ■ | १५ | | ■ | १६ | | | ■ | |
| १७ | | ■ | १८ | | ■ | १९ | | | ■ | २० | |
| ■ | २१ | २२ | | ■ | २३ | ■ | | ■ | २४ | | |
| २५ | | | ■ | २६ | | | ■ | २७ | | | ■ |
| | ■ | २८ | २९ | ■ | | ■ | ३० | ■ | | ■ | ३१ |
| ■ | ३२ | ■ | ३३ | | ■ | ३४ | ■ | ३५ | | ३६ | |
| ३७ | | ३८ | | ■ | ३९ | | ४० | | ■ | ४१ | |
| | ■ | | ■ | ४२ | ■ | ४३ | | ■ | ४४ | | ■ |
| ४५ | ४६ | ■ | ४७ | | ४८ | ■ | ४९ | ५० | ■ | ५१ | ५२ |
| ■ | ५३ | | ■ | ५४ | | | ■ | ५५ | | ■ | |

**आडवे शब्द :** १.महाराष्ट्राचे लाडके दैवत ५.स्वराज्याची पहिली राजधानी असलेला किल्ला ८.स्वर्गीय लता मंगेशकर जी यांना मिळालेली एक उपाधी ११.आवड १३.हिंदीत-बहर १५.एक बसण्याचे पारंपारिक लाकडी साधन १६.आवडलेला १७.व्याधी १८.बाज डौल १९.दक्ष२०. नादमय ठेका २१.एक हिंदी सिने अभिनेत्री *** अडवाणी २४.पुन्हा २५.रामायण काळातील एक सुवर्णमृग २६.समुद्र २७.एव्हरेस्ट चढण्यात पटाईत असलेले तिबेटियन वंशाचे नागरिक २८.किनार ३०.इंग्रजी वर्णमालेतील दुसरे वर्ण ३३.एक औषधी वनस्पती ३५.वातावरण ३७.जगातील सर्वात प्रसिद्ध धबधबा ३९.प्रतिक्रिया ४१.नवे ४३.पहाटे गवतावर पडणारे पाण्याचे थेंब ४४.मोठे ४५ पाणी ४७.पीठ मळण्याचे पात्र ४९.तग ५१.व्यवस्थित ५३.बांगलादेशची राजधानी ५४.शासन करणारा ५५.रान रेडा **उभे शब्द :** १.गोंगाट २.वेतन ३.दोन आणि एक मिळून तयार होणारी संख्या ४.राजा ६.७.हिंदीत-भीती ९.एका सरळ रेषेत १२.सूट १४.पराभव १६.वारा १८.जागा २०.एक आदिवासी नृत्य २२.याचना करणारा २३.एक पांढरा शुभ्र पक्षी २४.केलेल्या कामाची चीज २५.आईचा भाऊ २९.डाव्या हाताने काम करणारा ३१.मनुष्य ३२.माता ३४.फिकट नसलेले ३५.वेस ३६.अपमान ३७. उदास ३८.समूह ४०.शिकार ४२.हताश ४६.संघर्ष ४८. सत-उलट लिहा ५०.नंतर ५२.नजर

**शब्दकोडे क्रमांक : १ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इ | रा | क | ■ | हि | शे | ब | ■ | वि | का | र | ■ |
| रा | ■ | द्र | व | ■ | ष | ट | क | ■ | ढा | ■ | द |
| दा | स | ■ | जा | ल | ना | ■ | मा | ह | ■ | ब | म |
| ■ | म | ज | ■ | बा | ग | बा | न | ■ | स | द | न |
| प्र | ता | प | ग | ड | ■ | ज | ■ | या | त | ना | ■ |
| त | ■ | त | डा | ■ | का | ■ | दी | न | ■ | म | ती |
| ■ | बा | प | ■ | स | म | शे | र | ■ | स | ■ | ट |
| गा | ळ | ■ | ह | रा | ■ | ती | ■ | प्र | मा | ण | ■ |
| र | ■ | ग | या | व | या | ■ | आ | ■ | ज | ■ | घी |
| वा | ता | ह | त | ■ | रा | य | ग | ड | ■ | मे | ■ |
| ■ | र | न | ■ | ना | ना | ■ | म | ■ | शां | घा | य |
| ता | क | ■ | वा | डी | ■ | ज | न | म | त | ■ | ज्ञ |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### ११८ वर्षा पूर्वीच्या प्रश्नाची झाली सोडवणूक

सोलापूर महानगरपालिका हद्दीतील



नागरिकांना मालकी हक्क देणारा शंभर वर्षांपूर्वी चा प्रश्न अखेर सुटला ही बातमी पाहिली. राज्य शासना चे अभिनंदन...! सामान्य नागरिकांना या भल्या मोठ्या कालावधीत किती त्रास सोसावा लागला असेल याची कल्पना करता येणार नाही,. कितीतरी पिढ्या या निर्णयाची वाट पहात अंनतात विलीन झाल्या असतील माहिती नाही.''जस्टिस डिले,जस्टिस डिनाय '' याचं उदाहरण आहे असं वाटतं. येथे प्रश्न हा उपस्थित होतो कि, स्वातंत्र्या पूर्वीच्या आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ७० वर्षा पूर्वीच्या अश्या किती केसेस न्यायालयात अथवा शासनाकडे प्रलंबित आहेत याचा आढावा घेऊन जलद  निर्णय घेता येईल का ? हे पाहणे आवश्यक आहे.यात मुंबई येथील गिरणी कामगारांच्या घराचा व पुनर्वसना चा प्रश्न,धरणग्रस्तांच्या , कामगारा च्या घराचा,झोपडपट्टी चा आणि कौटुंबिक वादविवादा च्या प्रश्नास न्याय देऊन सोडवणूक करणे आवश्यक आहे.

- रफिक मुन्शी, अहिल्यानगर

### मुंबईतील मुसळधार पावसामुळे महाराष्ट्र पान व्यापारी महासंघाचा मोर्चा १४ जुलैला

अहिल्यानगर- महाराष्ट्र पान व्यापारी महासंघाच्या वतीने मुंबई येथील आझाद मैदानावर ७ जुलै रोजी आयोजित करण्यात आलेला भव्य धडक मोर्चा मुंबईतील मुसळधार पाऊस व प्रतिकूल हवामानामुळे पुढे ढकलण्यात आला असून आता हा मोर्चा मंगळवार, दि. १४ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता आझाद मैदान, मुंबई येथे होणार आहे. याबाबत महासंघाने नव्याने पत्रक प्रसिद्ध करून राज्यातील सर्व पान शॉप व्यावसायिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. महासंघाच्या म्हणण्यानुसार, अन्न व औषध प्रशासन तसेच इतर यंत्रणांकडून पान दुकानदारांवर होत असलेल्या कारवायांविरोधात हा मोर्चा काढण्यात येत आहे. राज्यभरातील पान शॉप व्यावसायिकांनी १४ जुलै रोजी आपला व्यवसाय बंद ठेवून मुंबईतील आझाद मैदानावर एकत्र यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अन्न व औषध प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या अन्यायकारक कारवाया तात्काळ थांबवाव्यात तसेच सुगंधी तंबाखूवरील बंदीबाबत योग्य निर्णय घेण्यात यावा. पानपट्टी चालकांवर होणाऱ्या बेकायदेशीर कारवाया थांबवाव्यात. पोलिसांकडून होणारा चुकीच्या अर्थाने कायद्याचा वापर रोखावा. पान शॉप व्यावसायिकांना अनुदान व विनातारण कर्ज उपलब्ध करून द्यावे.

### सामाजिक कार्यकर्त्यांचा 'पसायदानी स्वधर्म' स्वीकारण्याचा संकल्प

अहिल्यानगर -  भारतीय संविधानाच्या कलम २५ ने प्रत्येक नागरिकाला अंतःकरणाचे स्वातंत्र्य तसेच धर्मस्वातंत्र्य बहाल केले आहे. या संवैधानिक अधिकाराच्या चौकटीत राहून संत ज्ञानेश्वर माऊलींच्या 'पसायदान' या विश्वकल्याणाच्या संदेशातून प्रेरणा घेत ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी, त्यांचे मित्र, सहकारी आणि विचारसहकारी यांनी 'पसायदानी स्वधर्म' स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. लवकरच सार्वजनिकरीत्या हा स्वधर्म स्वीकारून निसर्ग, जीवसृष्टी आणि संपूर्ण मानवतेच्या कल्याणासाठी सामूहिक संकल्प करण्यात येणार असल्याची माहिती ॲड. गवळी यांनी दिली.हा स्वधर्म कोणत्याही विशिष्ट जात, पंथ, कर्मकांड किंवा जन्माधारित श्रेष्ठत्वावर आधारित नसून, संविधानातील न्याय, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि पर्यावरणीय जबाबदारी या मूल्यांना अंतःकरणाची दिशा देणारा विचार आहे. निसर्ग, सर्व जीवसृष्टी आणि मानवतेच्या एकात्मिक कल्याणासाठी प्रत्येक व्यक्तीने आपल्या मूलभूत कर्तव्यांची जाणीव ठेवून जीवन जगावे,




एकविरा चौक ते यशोदानगर भाजी बाजार तसेच प्रोफेसर चौक रोड लगत टपऱ्या शेड लोखंडी बोर्ड हटविण्याची मोहीम अतिक्रमण पथकाने राबविण्यात आली. आयुक्त यांच्या आदेशानुसार. अतिक्रमण प्रमुख श्री आदित्य बल्लाळ  सावेडी प्रभाग अधिकारी श्री गणेश जी वाकळे क्षेत्रीय अधिकारी देविदास बिजा साहेब अतिक्रमण पथक वाहन तसेच संबंधित वार्डातील नगरसेवक यांच्या उपस्थितीत मोहीम घेण्यात आली.

# शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या पैठण तालुका प्रमुखपदी देविदास (राजू) बोंबले

## गरजू रुग्णांना शासकीय योजना व वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी सहा महिन्यांची नियुक्ती

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून गोरगरीब व गरजू रुग्णांना वैद्यकीय सेवा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी देविदास (राजू) रावसाहेब बोंबले यांची पैठण तालुका प्रमुखपदी सहा महिन्यांसाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या आदेशानुसार तसेच शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे संस्थापक-अध्यक्ष मंगेश नरसिंह चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली. याबाबतचे नियुक्तीपत्र १ जुलै २०२६ रोजी प्रदान करण्यात आले.



तालुका प्रमुख म्हणून बोंबले यांच्यावर आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजू व गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांना धर्मादाय रुग्णालयांतील १० टक्के राखीव खाटांचा लाभ मिळवून देणे, पात्र रुग्णांना निकषांनुसार मोफत अथवा सवलतीच्या दरात शस्त्रक्रियेसाठी मार्गदर्शन करणे, तसेच महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक समन्वय साधण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

याशिवाय, गंभीर व खर्चिक शस्त्रक्रियांसाठी पंतप्रधान वैद्यकीय सहाय्यता निधी, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, श्री सिद्धिविनायक ट्रस्ट, टाटा ट्रस्ट आदी विविध संस्थांच्या माध्यमातून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी मुख्य कार्यालयाशी समन्वय साधण्याच्या सूचनाही नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आल्या आहेत. देविदास (राजू) बोंबले यांच्या नियुक्तीमुळे पैठण तालुक्यातील गरजू रुग्णांना शासकीय आरोग्य योजना, आर्थिक सहाय्य आणि उपचारांची प्रक्रिया अधिक सुलभ होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# धर्म, संस्कार आणि समाजसंघटन यांचा अद्वितीय संगम म्हणजे समर्पण चातुर्मास– अशोक बोरा

## नागापूर जैन धर्मस्थानकाच्या भव्य लोकार्पण सोहळ्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** श्री सकल जैन श्रावक संघ, आदर्शनगर-नागापूर यांच्या वतीने नव्याने उभारण्यात आलेल्या जैन धर्मस्थानकाचा भव्य लोकार्पण सोहळा अत्यंत भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

प.पू. आचार्य सम्राट राष्ट्रसंत आनंदऋषीजी म.सा. यांच्या पावन आशीर्वादाने तसेच महाराष्ट्र प्रवर्तक प.पू. कुंदनऋषीजी म.सा., सरल स्वभावी प.पू. दिव्यदर्शनजी म.सा. आणि संस्कारदाता प.पू. सिद्धार्थमुनीजी म.सा. यांच्या प्रेरणेने उभारण्यात आलेल्या या धर्मस्थानकाचे लोकार्पण अर्हम विज्ञा प्रणेता उपाध्याय प्रवर प.पू. प्रविणऋषीजी म.सा. (आदी ठाणा-२) यांच्या पावन सान्निध्यात झाले.

यावेळी महापौर सौ. ज्योतीताई गाडे, समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक (बाबुशेठ) बोरा, श्री नागापूर जैन श्रावक संघाचे अध्यक्ष अशोक भंडारी, राजेशजी भंडारी, ईश्वरजी बोरा, नवनाथजी कातोरे, डॉ. सागरजी बोरूडे, बाबासाहेब नागरगोजे, पुष्करजी कुलकर्णी, हनुमान कातोरे, सतीशजी सुराणा (पुणे), उद्योजक राहुलजी जैन यांच्यासह अनेक मान्यवर व भाविक उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या प्रारंभी सासू मंडळ, बहू मंडळ व कन्या मंडळाने स्वागतगीत व भक्तिरसपूर्ण स्तवनांचे सादरीकरण केले.

प्रास्ताविकात अध्यक्ष अशोक भंडारी यांनी धर्मस्थानक उभारणीचा प्रवास, समाजबांधवांचे सहकार्य आणि या वास्तूचे धार्मिक व सामाजिक महत्त्व अधोरेखित करत सर्व दानदाते व कार्यकर्त्यांचे आभार मानले.

धर्मस्थानकासाठी मौल्यवान जागेचे भूमिदान करणाऱ्या स्व. श्री. जवाहरलालजी तथा रविलालजी राहुलजी रूपेशजी रोहितजी गुगळे परिवाराच्या उदात्त योगदानाचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच स्थानक उभारणीसाठी भरीव आर्थिक योगदान दिल्याबद्दल युवा उद्योजक व महावीर समूहाचे राजेशजी भंडारी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. याचप्रमाणे समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक (बाबुशेठ) बोरा आणि आनंदतीर्थचे संस्थापक अध्यक्ष सतीशजी सुराणा (पुणे) यांचाही धार्मिक व सामाजिक योगदानाबद्दल शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

गौतम डागा व लता कटारिया यांनी मार्गदर्शनपर विचार व्यक्त केले. सावेडी जैन संघाचे अध्यक्ष संदीपजी गांधी यांनी सूत्रसंचालन केले.

यावेळी उपाध्याय प्रवर प.पू. प्रविणऋषीजी म.सा. यांनी आपल्या आशीर्वचनात सांगितले की, ''धर्मस्थानक ही केवळ दगड-विटांची वास्तू नसून आत्मजागृती, साधना आणि संस्कारांचे पवित्र केंद्र आहे. या स्थानकातून धर्मआराधनेची अखंड ज्योत प्रज्वलित राहो आणि प्रत्येक जीवाच्या आत्मकल्याणाचा मार्ग प्रशस्त होवो अशी मंगलकामना करत त्यांनी मंगल पाठ दिले.

समारोपप्रसंगी अशोक (बाबुशेठ) बोरा यांनी समर्पण चातुर्मास२०२६ हा समाजाच्या श्रद्धा, संस्कार व एकात्मतेचा ऐतिहासिक महोत्सव ठरणार असून प्रत्येक समाजबांधवाने तन, मन आणि धनाने सहभागी व्हावे, असे आवाहन केले. यावेळी त्यांनी ''एक ही नारा  चातुर्मास हमारा!'' अशी घोषणा देत उपस्थितांकडून तिची उत्स्फूर्त पुनरावृत्ती करून घेतली. ''प्रत्येक समाजबांधव हा समर्पण चातुर्मासाचा यजमान आहे,'' असे सांगत त्यांनी प्रत्येक घरातून या महाआयोजनात सक्रिय सहभागाची अपेक्षा व्यक्त केली.

#### अपहरणामागे खासदार निलेश लंके यांचा हात

# सीबीआय किंवा एसआयटीमार्फत तपास करा- किशोर महादेव परभणे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आपल्या कथित अपहरण प्रकरणामागे खासदार निलेश लंके यांचा हात असल्याचा गंभीर आरोप करत या संपूर्ण प्रकरणाचा निष्पक्ष तपास केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) किंवा विशेष तपास पथक (एसआयटी) मार्फत करण्यात यावा, अशी मागणी किशोर महादेव परभणे यांनी पत्रकार परिषदेत केली. तसेच राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात हस्तक्षेप करून स्वतंत्र चौकशीचे आदेश द्यावेत, अशीही त्यांनी मागणी केली.

परभणे यांनी सांगितले की, १ मे २०२६ रोजी त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात अर्ज दिल्यानंतर ४ मे रोजी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर ५ मे रोजी काळेवाडी येथे त्यांच्या विरोधात आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आणि २२ मे रोजी त्यांना अटक करण्यात आली.

काळेवाडी येथील महिलेने दाखल केलेल्या फिर्यादीतील अनेक बाबी ऑडिओ रेकॉर्डिंगमधून स्पष्ट होत असल्याचा दावा परभणे यांनी केला. संबंधित महिलेने काही प्रभावशाली व्यक्तींची नावे घेतल्याचे तसेच कामाच्या बदल्यात काही मागण्या करण्यात आल्याचे या रेकॉर्डिंगमध्ये असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यामुळे या सर्व बाबींची स्वतंत्र व सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

तपास प्रक्रियेबाबतही परभणे यांनी गंभीर आक्षेप घेतले. अपहरण प्रकरणातील महत्त्वाच्या सीसीटीव्ही फुटेजकडे दुर्लक्ष करण्यात आले असून, काही प्रभावशाली व्यक्तींच्या दबावामुळे तपासाची दिशा बदलल्याचा आरोप त्यांनी केला. अपहरणाच्या काळातील घटनाक्रम आणि संबंधित व्यक्तींच्या भूमिकेची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी परभणे यांनी दावा केला की, काळेवाडी येथील महिलेच्या फिर्यादीत काही संबंधित व्यक्तींची नावे स्पष्टपणे नमूद आहेत आणि त्यासंदर्भातील ऑडिओ रेकॉर्डिंगही उपलब्ध आहे. तसेच राणी लंके यांनी आपल्याला मारहाण केल्याचा आरोपही त्यांनी केला.

## खरवंडी कासार येथील शासकीय नकाशातील त्रुटींमुळे वाद; दुरुस्ती न झाल्यास उपोषणाचा जगताप यांचा इशारा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**खरवंडी कासार –** पाथर्डी तालुक्यातील मौजे खरवंडीकासार येथील नवीन सजा आणि मंडळ कार्यालयात भिंतीवर लावण्यात आलेल्या गावांच्या अधिकृत फ्लेक्स बोर्ड नकाशात मोठ्या त्रुटी असल्याचा गंभीर आरोप भारतीय मराठा महासंघाचे पाथर्डी तालुका अध्यक्ष श्री. अंबादास गंगाधर जगताप यांनी केला आहे.



या नकाशातील त्रुटींमुळे स्थानिक पातळीवर जमिनीचे वाद वाढत असून, प्रशासनाने १५ दिवसांत नकाशाची रीतसर दुरुस्ती न केल्यास आमरण उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. याबाबत त्यांनी उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना स्मरणपत्र सादर केले आहे.


नेमका काय आहे वाद? मिळालेल्या माहितीनुसार, खरवंडी, जवळवाडी, मालेवाडी, भारजवाडी आणि ढाकणवाडी ही पाच गावे पूर्वीपासून एकत्र असून त्यांचा गाव नकाशा एकत्र होता. मात्र, सध्या खरवंडी तलाठी कार्यालयातील भिंतीवर लावलेल्या नवीन डिजिटल (फ्लेक्स) नकाशात आणि भूमी अभिलेख कार्यालयाकडून मिळालेल्या मूळ नकाशात मोठी विसंगती दिसून येत आहे.अर्जदार अंबादास जगताप यांनी पत्रात नमूद केले आहे की, त्यांच्या वडिलोपार्जित जमिनीतून जाणारा जुना ओढा, रस्ता आणि विहीर (मोट नाडा) यांच्या खुणा मूळ इंग्रजकालीन टिपण उताऱ्यात आणि जुन्या रेकॉर्डमध्ये स्पष्टपणे नोंदवलेल्या आहेत. परंतु, महसूल कार्यालयात लावण्यात आलेल्या नवीन नकाशावर या कोणत्याही खुणा, विहिरी किंवा जमिनीच्या प्रत्यक्ष हद्दी दर्शवलेल्या नाहीत.

शासकीय नकाशातच अशा गंभीर त्रुटी असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आपापसात वाद-विवाद निर्माण होत आहेत.प्रशासनाला १५ दिवसांचा अल्टिमेटमभूमी अभिलेख कार्यालयाच्या नकाशातील संदर्भ कॉलम आणि प्रत्यक्ष नकाशा या दोन्हीची प्रशासनाने समक्ष स्थळ पाहणी करून पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, खरवंडी कार्यालयातील त्रुटी असलेला जुना फ्लेक्स बोर्ड नकाशा त्वरित हटवून इंग्रजकालीन दस्तऐवजाप्रमाणे दुरुस्त केलेला अधिकृत नवीन नकाशा १५ दिवसांच्या आत उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे..अन्यथा कार्यालयासमोर उपोषण!दिलेल्या मुदतीत या तांत्रिक चुकांची दुरुस्ती न झाल्यास सज्जा खरवंडी कार्यालय किंवा उपविभागीय कार्यालय पाथर्डी समोर आमरण उपोषणाला बसणार असल्याचे जगताप यांनी स्पष्ट केले आहे. या निवेदनाच्या प्रती तहसीलदार, भूमी अभिलेख कार्यालय, पोलीस स्टेशन पाथर्डी आणि तलाठी कार्यालय खरवंडी यांना माहिती व पुढील कारवाईसाठी पाठवण्यात आल्या आहेत.

# महात्मा फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षात रात्रशाळांना न्याय द्या; राष्ट्रवादी शिक्षक सेलची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** रात्रशाळांचे जनक, आधुनिक भारतातील महान समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विजन्मशताब्दी जयंती वर्षानिमित्त राज्यातील रात्रशाळांना न्याय मिळावा आणि त्यामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना समान संधी उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी शिक्षक सेल यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे.




या संदर्भात राष्ट्रवादी शिक्षक सेलचे अध्यक्ष (माजी प्राचार्य) अविनाश ताकवले, उपाध्यक्ष दत्तात्रय सोनवणे (मुंबई), कार्याध्यक्ष नंदकुमार सातपुते (ठाणे), सरचिटणीस प्रा. सुनिल सुसरे (अहिल्यानगर) आणि खजिनदार गजेंद्र गाडगीळ (अहिल्यानगर) यांनी मुख्यमंत्री यांना सविस्तर निवेदन पाठवून रात्रशाळांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची विनंती केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, महात्मा ज्योतिराव फुले यांनी १९व्या शतकात शिक्षणावरील सामाजिक बंधने, जातीय विषमता आणि अंधश्रद्धेविरोधात संघर्ष करत शिक्षणाचा अधिकार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या सहकार्याने त्यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली आणि वंचित, शोषित, कष्टकरी समाजातील मुलामुलींना शिक्षणाची संधी मिळावी म्हणून रात्रशाळांची संकल्पना प्रत्यक्षात आणली. आज या विचारांचा विस्तार होत महाराष्ट्रात सुमारे १६५ माध्यमिक व उच्च माध्यमिक रात्रशाळा कार्यरत आहेत.

रात्रशाळा या दिवसभर काम करून रात्री शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरल्या आहेत. आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या हजारो विद्यार्थी-विद्यार्थिनींना या शाळांमुळे शिक्षणाची संधी मिळत आहे. मात्र, या विद्यार्थ्यांना अद्यापही शालेय शिक्षण विभागाकडून दिवसाच्या शाळांप्रमाणे समान सुविधा आणि दर्जा मिळत नसल्याची खंत संघटनेने व्यक्त केली आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, सध्याच्या रात्रशाळांमध्ये अध्यापनाचे तास कमी असल्याने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होत आहे. परिणामी अनेक विद्यार्थी विज्ञान, वाणिज्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) तसेच इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेताना गुणवत्तेच्या निकषांमुळे मागे पडतात. ४ डिसेंबर २०१८ रोजी शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य यांनी शालेय शिक्षण विभागाकडे सादर केलेल्या अहवालानुसार रात्रशाळांना पूर्णवेळ दर्जा दिल्यास कोणताही अतिरिक्त आर्थिक भार न पडता विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा हक्क मिळू शकतो, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. महात्मा फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षात त्यांच्या शिक्षणक्रांतीच्या कार्याला खऱ्या अर्थाने अभिवादन करायचे असेल तर रात्रशाळांना नवसंजीवनी देणारे निर्णय तातडीने घ्यावेत, अशी मागणी राष्ट्रवादी शिक्षक सेलने केली आहे.

संघटनेच्या प्रमुख १४ मागण्यांमध्ये रात्रशाळांना पूर्णवेळ शाळेचा दर्जा देण्यात यावा, आदिवासी व आश्रमशाळांप्रमाणे विशेष दर्जा देऊन संचमान्यतेच्या निकषांमध्ये शिथिलता आणावी, इयत्ता ९ वी ते १२ वीच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके उपलब्ध करून द्यावीत, शैक्षणिक, क्रीडा व कौशल्य क्षेत्रात विशेष गुणवत्ता मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा शिक्षण विभागाकडून सन्मान करण्यात यावा, शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणाऱ्या रात्रशाळांचा जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर गौरव करण्यात यावा, उल्लेखनीय कार्य करणाऱ्या रात्रशाळांतील शिक्षकांना जिल्हा व राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात यावेत, विशेषतः मुंबईतील महानगरपालिका इमारतींमध्ये चालणाऱ्या १२९ रात्रशाळांचे इमारत भाडे पूर्णपणे माफ करण्यात यावे, संस्थांच्या इमारतींमध्ये चालणाऱ्या रात्रशाळांचे वीजबिल माफ करावे किंवा सौरऊर्जा सुविधा उपलब्ध करून द्यावी, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन, तर त्यानंतर नियुक्त झालेल्यांना प्रचलित पेन्शन योजना लागू करावी, मार्च २००८ च्या वेतनाधारित वेतनेतर अनुदान दुप्पट करण्यात यावे, प्रत्येक रात्रशाळेत मुख्याध्यापक पद मंजूर करण्यात यावे, अर्धवेळ सेवेला पूर्णवेळ सेवेसमान मान्यता देऊन वरिष्ठ व निवडश्रेणी तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ द्यावा, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत रात्रशाळेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या उपस्थितीच्या अडचणी लक्षात घेऊन शिजवलेल्या भोजनाऐवजी बंद पाकीट (पार्सल) स्वरूपात लाभ देण्यात यावा, रात्रशाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्यास शासनाने परवानगी देण्याची मागणी करण्यात आली आहे.

# विद्यार्थ्यांनी अमली पदार्थांपासून दूर राहून उज्वल भविष्य घडवावे – डॉ. उद्धव शिंदे

### स्नेहबंधतर्फे कै. दामोधर विधाते प्राथ. व माध्य.विद्यालय, येथे अमली पदार्थ विरोधी जनजागृती कार्यक्रम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** स्नेहबंध सोशल फौंडेशन, अहिल्यानगर यांच्या वतीने कै. दामोधर विधाते प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, सारसनगर येथे विद्यार्थ्यांसाठी अमली पदार्थ विरोधी जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या व्यसनाचे दुष्परिणाम, त्यापासून होणारी शारीरिक, मानसिक व सामाजिक हानी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

डॉ. शिंदे म्हणाले, ''अमली पदार्थ हे व्यक्ती, कुटुंब आणि समाजासाठी घातक आहेत. विद्यार्थ्यांनी चुकीच्या संगतीपासून दूर राहून शिक्षण, खेळ, संस्कार आणि सकारात्मक विचार यांना प्राधान्य द्यावे. कोणत्याही प्रकारच्या व्यसनाला नाही म्हणण्याची हिंमत प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये असली पाहिजे. व्यसनमुक्त युवकच सशक्त आणि प्रगत भारत घडवू शकतात.'

कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी म्हस्के तसेच विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार मुख्याध्यापक शिवाजी म्हस्के यांनी मानले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमधील सेवाभाव रूग्णांसाठी वरदान - मंगेश चिवटे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरात जैन सोशल फेडरेशन आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून रूग्णसेवा महायज्ञ अखंडपणे चालवत आहे. अल्प दरात आणि वेळ प्रसंगी मोफत मिळणारे दर्जेदार उपचार सर्वसामान्य रूग्णांसाठी वरदान ठरत आहेत. येथील वैद्यकीय उपचारांमध्ये सेवाभाव असल्याने राज्यभरातील रूग्ण विश्वासाने याठिकाणी येतात. येथील जागतिक दर्जाचे वैद्यकीय उपकरणे, तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टरांची टिम, तत्पर स्टाफ यामुळे रूग्णांना दिलासा मिळतो. येथील रूग्णांना हिप व गुडघे या सांधेबदल शस्त्रक्रियांसाठी संतोष बोथरा यांच्या आग्रहानुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षामार्फत मदत मिळावी यासाठी आवर्जून प्रयत्न करू, अशी ग्वाही मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे माजी अध्यक्ष तथा शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे अध्यक्ष मंगेश चिवटे यांनी दिली. यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे नुकतेच मोफत कॅन्सर तपासणी शिबीर घेण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी शिवसेनेचे सचिव राम रेपाळे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे अध्यक्ष मंगेश चिवटे, शिवसेनेचे अहिल्यानगर येथील पदाधिकारी, जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, डॉ.वसंत कटारिया, प्रशासन अधिकारी डॉ.आशिष भंडारी आदी उपस्थित होते.

स्वागत करताना संतोष बोथरा म्हणाले की, हॉस्पिटलच्या माध्यमातून प्रत्येक रूग्णाला माफक दरात उच्च दर्जाच्या उपचार सुविधा देण्यात येतात. शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ रूग्णांना मिळवून दिला जातो. शासनाच्या योजनांसाठी मंगेश चिवटे यांनी सातत्याने हॉस्पिटलला सहकार्य केले आहे. त्यांच्या माध्यमातून सांधेबदली शस्त्रक्रियाच्या रूग्णांनाही शासनाकडून मदत मिळेल असा विश्वास आहे.

राम रेपाळे म्हणाले, राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांचे नाव असलेल्या या हॉस्पिटलमधील सेवा कार्य खरोखरच कौतुकास्पद आहे. वर्षभर विविध शिबिरांच्या माध्यमातून रूग्णांची तपासणी व माफक दरात उपचार केले जातात. याचा राज्यातील रूग्णांना लाभ होतो. सुसज्ज नेत्रालयातूनही दृष्टीदोष निर्मूलनाचे मोठे कार्य होत आहे. अशा सेवाभावी आरोग्य सेवेचा इतरांनीही आदर्श घेतला पाहिजे. शेवटी डॉ.आशिष भंडारी यांनी आभार मानले.

# पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज – माजी प्राचार्य शितोळे

### कल्याण रोड फॅमिली विश्व मॉल डीपी रस्त्याच्या दुभाजकामध्ये ॲड. युवराज शिंदे यांच्या सहकार्यातून वृक्षारोपण



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कल्याण रोड येथील फॅमिली विश्व मॉललगतच्या डीपी रस्त्यावर सामाजिक कार्यकर्ते ॲड. युवराज शिंदे यांच्या सहकार्याने वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात पार पडला. यावेळी माजी प्राचार्य खासेराव शितोळे म्हणाले की, पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे ऋतुमानात मोठ्या प्रमाणात बदल होत असून अवेळी पाऊस, कोणत्याही ऋतूत ऊन, वारा, थंडी व पावसाचे असंतुलित चक्र अनुभवास येत आहे. याचा मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने सामाजिक बांधिलकी जपत निसर्गावर प्रेम करणे आवश्यक आहे. ॲड. युवराज शिंदे हे अनेक वर्षांपासून कल्याण रोड परिसरात विविध सामाजिक उपक्रम राबवत असून त्यांनी हाती घेतलेला वृक्षारोपण व संवर्धनाचा उपक्रम कौतुकास्पद आहे. पुढील पिढ्यांच्या भविष्यासाठी चांगले कार्य उभे करणे आवश्यक असून वाढते तापमान व महानगरांतील वायुप्रदूषणाचा विचार करता वृक्षारोपण व संवर्धन ही काळाची गरज बनली आहे. वृक्ष आपल्याला चोवीस तास मोफत प्राणवायू देतात, असे त्यांनी सांगितले.

ॲड. युवराज शिंदे म्हणाले की, कल्याण रोड परिसराच्या विकासासाठी आमदार संग्राम जगताप व माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. त्यातून या भागासाठी मोठा निधी उपलब्ध झाला असून मूलभूत प्रश्नांसह विविध विकासकामे मार्गी लावण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. कल्याण रोड हे विकसित उपनगर व्हावे यासाठी प्रयत्न सुरू असून वृक्षारोपण व संवर्धन ही लोकचळवळ व्हावी, यासाठी सर्वांना सोबत घेऊन 'हरित कल्याण रोड' निर्माण करण्याचे काम हाती घेतले जाईल. सण, उत्सव व वाढदिवस साजरे करताना सकारात्मक दृष्टिकोन ठेवून सामाजिक बांधिलकी जपणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

पारुनाथ ढोकळे म्हणाले की, ॲड. युवराज शिंदे हे कोणतेही पद नसतानाही कल्याण रोड परिसराच्या विकासासाठी सातत्याने कार्यरत असून जनतेचे छोटे-मोठे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतात. त्यांनी सुरू केलेले वृक्षारोपण व संवर्धनाचे कार्य कौतुकास्पद आहे. प्रा. भगवानराव काटे यांनीही वृक्षारोपणाचे महत्त्व विशद केले.

या प्रसंगी माजी प्राचार्य खासेराव शितोळे, आयोजक ॲड. युवराज शिंदे, पारुनाथ ढोकळे, प्रा. भगवान काटे, एल. बी. म्हस्के, शिवाजी शिंदे, राजेंद्र शिंदे, देवा होले, अरुण ढाकणे, संभाजी चौधरी, गणेश बेरड, शेषराव आगळे, शंकर शिरसुल, सतीश लगड, पंडित हराळ, बाबासाहेब आंधळे, केशव चेमटे, सुधाकर बोल्ली, दत्तात्रेय मित्याल, पुंडलिक आरवडे, किशोर नावकार, रोहित काळोखे, विवेक खोसे, कोरडे सर यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संभाजी चौधरी यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिवाजी शिंदे यांनी मानले.

# भगवद्गीता हे विजयाचे शास्त्र; आत्मविजयातुनच यशाचा मार्ग - डॉ. संजय मालपाणी

### कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या १०७ व्या जयंतीनिमित्त शेवगाव येथे भव्य सोहळा; काकडे विद्यालयाच्या 'साधना' इतिहासग्रंथाचे प्रकाशन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




(छाया : बाबा पालवे)

**शेवगाव–** ''भगवद्गीता हा केवळ धार्मिक ग्रंथ नसून मानवी जीवनाला दिशा देणारे विजयाचे शास्त्र आहे. जीवनातील कोणत्याही संघर्षात यशस्वी व्हायचे असेल, तर प्रथम स्वतःच्या मनावर विजय मिळवणे आवश्यक आहे,'' असे प्रतिपादन मालपाणी उद्योग समूहाचे प्रमुख डॉ. संजय मालपाणी यांनी केले.

कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या १०७ व्या जयंतीनिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात ते प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते. यावेळी कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष ॲड. शिवाजीराव काकडे, शिवसेना नेत्या तथा माजी जिल्हा परिषद सदस्या सौ. हर्षदा काकडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मण बिटाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंग काकडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

काम, क्रोध आणि लोभ हे मनुष्याचे सर्वात मोठे शत्रू आहेत. त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी मनावर ताबा आवश्यक आहे. मन शांत आणि विचार शुद्ध झाले की विकार आपोआप दूर होतात. विद्यार्थ्यांनी योग, सकारात्मक विचार आणि आत्मशिस्त यांचा अंगीकार केल्यास यश निश्चित मिळते असा उपदेश देत परीक्षेचा ताण न घेता आत्मविश्वासाने आणि आनंदी वृत्तीने प्रत्येक आव्हानाला सामोरे जावे. अपयश आले तरी खचून न जाता नव्या उमेदीने उभे राहणे, ऐकण्याची सवय लावणे आणि सातत्यपूर्ण प्रयत्न करणे हेच यशाचे खरे सूत्र आहे. भगवद्गीतेचा संदेश प्रत्येक विद्यार्थ्याला आत्मविकास आणि जीवनविजयाचा मार्ग दाखवणारा असल्याचा सल्ला डॉ.मालपाणी यांनी यावेळी बोलताना दिला.

भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णांनी मानवाला कर्तव्य, नेतृत्व, संस्कार, राष्ट्रनिर्मिती आणि जीवनमूल्यांचा अनमोल संदेश दिला आहे. कर्मयोगी आबासाहेब काकडे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शाळा, महाविद्यालये आणि वसतिगृहे उभारून ज्ञानयज्ञ अखंड तेवत ठेवला. त्यांच्या कार्याचा प्रेरणादायी वारसा भावी पिढ्यांसाठी दीपस्तंभ ठरणारा असल्याचे प्रतिपादन ॲड. शिवाजीराव काकडे यांनी प्रास्ताविकपर बोलताना केले. याप्रसंगी आबासाहेब काकडे विद्यालयाच्या गौरवशाली वाटचालीचा इतिहास उलगडणाऱ्या 'साधना' या विशेष इतिहासग्रंथाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. संस्थेच्या संघर्ष, जिद्द आणि शैक्षणिक योगदानाचा जिवंत दस्तऐवज म्हणून या ग्रंथाकडे पाहिले जात आहे.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.गोविंद वाणी आणि प्रा.जरीना शेख यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमास पालक,विद्यार्थी,शिक्षक,गीता परिवाराचे सदस्य तसेच शेवगाव-पाथर्डी तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी महिलांची संख्या लक्षणीय होती.

# नेवासा सुवर्णकार संघटनेच्या अध्यक्षपदी मनोज डहाळे बिनविरोध निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**नेवासा–** नेवासे शहरातील व्यापारी(गोल्ड व्हॅल्यूवर)श्री. मनोज डहाळे यांची सुवर्णकार संघटनेच्या नेवासे अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

सुवर्णकार संघटनेची गुरुवारी बैठक पार पडली. यावेळी सर्वानुमते मनोज डहाळे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. व्यवसायातील उत्कृष्ट अनुभव, सामाजिक कार्यातील सक्रिय सहभाग व सर्वांना सोबत घेऊन जाण्याची त्यांची कार्यपद्धती लक्षात घेऊन ही निवड करण्यात आली आहे.

निवडीनंतर मनोज डहाळे यांनी सांगितले की, ''सुवर्णकार बांधवांच्या समस्या सोडवण्यासाठी व संघटना अधिक मजबूत करण्यासाठी मी प्रामाणिकपणे काम करेन. सुवर्णकार समाजासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्नशील राहील त्यांच्या निवडीबद्दल नेवासे शहर व तालुक्यातील व्यापारी वर्ग, सुवर्णकार बांधव व विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# शिष्यवृत्ती परीक्षेत 'ज्ञानसाधना गुरुकुल' चे विद्यार्थी जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** ज्ञानसाधना बहुउद्देशीय आणि सेवाभावी संस्था संचलित ज्ञानसाधना गुरुकुल क्लासेस मधील पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत दोन विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत चमकले असून, १९ विद्यार्थी पात्र झाले असल्याची माहिती संचालक प्रा. प्रसाद जमदाडे यांनी दिली. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ साठी क्लासेस मधील इयत्ता ५ वी ८ वी चे मिळून २१ विद्यार्थी बसले होते. त्यांपैकी १९ विद्यार्थी पात्र झाले असून जिल्हा गुणवत्ता यादीत दोन विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. यामध्ये इयत्ता ५ वी चा विद्यार्थी चि. ओंकार नितीन चेमटे आणि इयत्ता ८ वी चा विद्यार्थी चि. हेमंत दीपक भालेकर यांनी अनुक्रमे ५००० रुपये आणि रुपये ७५०० रुपये प्रति वर्ष शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे.

विद्यार्थ्यांना क्लासेस मधील सर्व अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांचे कौतुक करताना प्रा.जमदाडे म्हणाले की, दरवर्षी प्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश मिळवून आपल्या आईवडिलांचे, शिक्षकांचे आणि क्लासेसचे नाव उंचावले आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्व शिक्षकवृंद, पालक आणि केडगाव मधील ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

(पान १ वरुन)

## मेहकरीतील सहा दूध केंद्रांवर अन्न व औषध विभागाचे छापे

आहेत. दूध भेसळखोरांवर कठोरात कठोर कारवाई करण्यासाठी आणि संशयित नमुने तपासणीसाठी विशेष मोहित हाती घेण्यात आली आहे. त्या अनुषंगाने शुक्रवारी सकाळीच विविध वाहनांतून नाशिकचे पथक नगरमध्ये दाखल झाले. त्यांनी नगर-पाथर्डी रस्त्यावरील मेहकरी आणि मराठवाडीजवळील दुध केंद्रांवर छापे टाकून दूध संकलन करणाऱ्या केंद्रांमधील दुधाचे नमुने तपासणीसाठी ताब्यात घेतले.

अन्न आणि औषध विभागाच्या अचानक या छापे सत्रामुळे दूध संकलन करणाऱ्या दूध डेअरी चालकांमध्ये खळबळ उडाली असून या छापा सत्रामध्ये सर्व दूध डेअऱ्यांमधील रेकॉड आणि दूध देणाऱ्या व्यावसायिकांचा आढावा घेण्याचे काम दिवसभर सुरु होते. त्यामुळे या दूध डेअरी चालकांमध्ये कोणी दोषी आढळते काय, याकडे लक्ष लागले आहे.

## लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने ५८ सफाई कर्मचाऱ्यांना नियुक्ती

की, प्रकरण क्रमांक ७६, ३०५ व ५०६ अन्वये विविध कारणांनी सेवानिवृत्त झालेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या पात्र वारसांना लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने सफाई कामगार पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. या प्रक्रियेत ५८ कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले. नवनियुक्तांनी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे व निष्ठेने पार पाडावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे व महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती वर्षा सानप यांनीही नवनियुक्त कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## चुकीचा शब्दप्रयोग खपवून घेणार नाही – उपनगराध्यक्ष अभय शेळके पा.

असंविधानिक शब्दाचा प्रयोग केल्याने उपनगराध्यक्ष अभय भैय्या शेळके यांनी तातडीची पत्रकार परिषद घेत संबंधितांना कडक शब्दात समज दिली व यापुढील काळात असा प्रकार खपवून घेतला जाणार नाही मुख्याधिकारी हे शहरातील उच्च पद असून त्यांच्या विषयी चुकीच्या शब्दांचा प्रयोग खपवून घेतला जाणार नसल्याचा यावेळी इशारा दिलाय

## ठेकेदारांकडे ७ कोटींची थकबाकी, पण ८ कोटींच्या वसुलीची नोटीस मात्र माथाडी कामगारांना

जात आहे. कामगारांनी अन्यायकारक वसुली मागे घेणे, थकबाकीदार ठेकेदार हुंडेकऱ्यांच्या मालमत्तांवर जप्ती आणून वसुली करणे, प्रत्येक कामगाराच्या वेतनाची स्वतंत्र लेखा परीक्षणाद्वारे तपासणी करणे, वेतन कपातीचा लेखी खुलासा देणे आणि कपात केलेली रक्कम व्याजासह परत देणे अशा प्रमुख मागण्या केल्या आहेत.

**अन्यथा आंदोलनाचा इशारा :**

गोरगरीब कामगारांनी हे कोट्यावधी रुपये आणायचे कुठून ? असा सवाल करत, यासंदर्भात सात दिवसांच्या आत लेखी खुलासा व थकबाकीदार ठेकेदारांच्या विरोधात ठोस कारवाई न झाल्यास सर्व कामगार सहाय्यक कामगार आयुक्तांच्या कार्यालयामध्ये सामूहिक फाशी देण्याची मागणी मंडळाकडे सर्व कामगार करणार असल्याचा विलास उबाळे यांनी इशारा दिला आहे. वेळ प्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कामगार आमरण उपोषण सुरू करतील, असा इशारा उबाळे यांनी यावेळी बोलताना दिला.

## मुख्य रस्त्याचे काम मंजूर आराखड्यानुसारच करा – खासदार लंके

याशिवाय शहरातील प्रमुख चौकांचे सुशोभीकरण, अपघातप्रवण धोकादायक वळणांचे निर्मूलन आणि वाहतुकीच्या दृष्टीने सुरक्षित नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. या कामांसाठी आवश्यक असल्यास निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

बैठकीत बाजार समितीचे संचालक रा. या. औटी यांनी राज्य मार्गामुळे नगर-कल्याण, पुणे-नाशिक आणि नगर-पुणे या प्रमुख मार्गांवरील वाहतूक वाढणार असल्याने शहरातील रस्त्याचे नियोजित रुंदीकरण अपरिहार्य असल्याचे मत व्यक्त केले.

या बैठकीस तहसीलदार गायत्री सौंदाणे, बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर, संचालक रा. या. औटी, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर, डॉ. बाळासाहेब कावरे, नगराध्यक्षा डॉ. विद्या कावरे, उपनगराध्यक्षा सुप्रिया शिंदे, माजी नगराध्यक्ष नितीन अडसूळ, माजी उपनगराध्यक्षा सुरेखा भालेकर, मुख्याधिकारी प्रियंका शिंदे, पाणीपुरवठा समितीचे सभापती योगेश मते तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, संबंधित ठेकेदार कंपनीचे प्रतिनिधी आणि विविध मान्यवर उपस्थित होते.